

# उन्हाळ्यात घ्या दुधाळ जनावरांची काळजी







उन्हाळ्यात वातावरणातील वाढलेल्या तापमानाचा जनावरांच्या उत्पादनक्षमतेवर दूध उत्पादन कमी होऊन त्यातील स्निग्धांशाचे प्रमाण कमी होते. त्यामुळे दुधाची प्रत खालावते. सुर्यप्रकाशाची तीव्रता, उन्हाळ्यामध्ये हवेचे तापमान आणि वातावरणातील आर्द्रता यात वाढ झाल्यामुळे जनावरांना उष्णतेचा त्रास होतो. हवेतील उष्णता वाढल्यास जनावरांचे शरीर तापमान व बाह्य तापमान यातील फरक वाढतो. जनावरांना शरीराबाहेर उष्णता टाकणे शक्य होत नाही. अधिक श्वासोच्छ्वास व घामाद्वारे उष्णता शरीराबाहेर टाकण्याचे प्रयत्न होतात. मात्र हवेतील वाढीव आर्द्रता शरीरावर उष्णतेचा ताण वाढविते. उष्णतेचा ताण हिवाळ्यात शरीर तापमान राखण्यास उपयोगी तर उन्हाळ्यात विपरीत परिणाम घडवितो. जनावरे कमी खातात, पाणी पिण्याचे प्रमाण वाढते, जनावरे उभीच असतात, कातडीचा रक्तप्रवाह वाढतो, शरीरातील अवयवांचा रक्तप्रवाह कमी होतो, दूध उत्पादन कमी होते, माजाची लक्षणे अस्पष्ट असतात, जनावरे गाभण राहण्याचे प्रमाण घटते. दुधाची प्रत कमी होते, गर्भावस्थेतील वासरांची वाढ कमी होते. दूध देणाऱ्या जनावरांना थंड हवामान मानवते. दिवसा म्हशी कमी चरतात आणि संध्याकाळी चरण्याकडे जास्त कल असतो, तसेच उष्णतेच्या वाढत्या प्रमाणाबरोबर जनावरांचे आजारी पडण्याचे प्रमाणही वाढत जाते.

## महत्वाच्या बाबी

- उन्हाळ्यात उष्णतेचा परिणाम कमी करणे, योग्य व्यवस्थापन करणे गरजेचे असते. जनावरांना सावली द्यावी. गोठ्यात हवा मोकळी व खेळती राहील याची काळजी घ्यावी.
- गोठ्याच्या छपरावर किंवा पत्र्यावर उसाच्या वाढ्यांच्या पेंढ्यांचे किंवा उसाच्या पाचटाचे, तसेच कडबा, तुराट्या यांचे आच्छादन करावे.
- जनावरांना दिवसातून किमान एकदा तरी खरारा करावा. खरारा करतेवेळी तो सोयीचा व हळुवारपणे करावा. त्यामुळे जनावरास थोडे तरतरीत वाटते व अंगावरील गोचीड व मरकट केस गळून पडतात.
- सूर्यकिरणांच्या उष्ण झळा लागू नयेत यासाठी गोठ्याच्या उघड्या भागात अंबाड्यांचे बारदाने लावावे, तसेच

प्रकाशन
महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर, संशोधन अनुदान अंतर्गत

बारदान्यावर एक ते दीड तासाच्या अंतराने पाणी शिंपडावे. गोठ्यातील उघड्या जमिनीवरही पाणी शिंपडावे, यामुळे गोठ्यात गारवा निर्माण होण्यास मदत होईल व गोठ्याचे तापमान सामान्य राहील.

- जनावरांच्या अंगावर दिवसातून तीन ते चार वेळा गार पाणी टाकावे. विशेषकरून दहा ते चार या वेळेमध्ये पाणी टाकावे. जनावरांच्या अंगावर पाणी टाकण्यासाठी गोठ्यांमध्ये फॉगर्स किंवा स्प्रिंकलर या नवीन पद्धतीचा अवलंब केला जात आहे, त्यामुळे पाण्याची बचत होण्यास मदत होईल. ज्या भागात पाण्याची टंचाई आहे, त्या भागात या पद्धतीचा अवलंब केल्यास पाण्याची बचत होण्यास मदत होईल.
- गोठ्यामध्ये फॅन व पिण्यासाठी स्वच्छ, गार पाण्याची व्यवस्था व कायमस्वरूपी पाणी साठविण्यासाठी हौद बांधावा.
- गोठ्याच्या आजूबाजूला हिरवी झाडे लावावीत, त्यामुळे सूर्यकिरण परावर्तित होतात व या सूर्यकिरणांपासून जनावरांचे रक्षण होते.
- जनावरांना स्वच्छ, गार पाणी दिवसातून पाच ते सहा वेळा द्यावे, कारण उष्णतेच्या तणावामुळे जनावरांची पाण्याची गरज वाढते. पाणी कमी मिळाल्यास जनावर चारा कमी खाते. जास्त पाणी प्यायल्यामुळे जनावरांची अन्न पचनाची क्षमता वाढते.
- मुबलक, थंड, स्वच्छ, ताजे पिण्याचे पाणी मिळाल्यास शरीराचे तापमान कमी होण्यास मदत होते. यासाठी स्वच्छ टाकी, टाकीचा मोठा आकार, गोठ्यातच असणारी टाकी अशी व्यवस्था असल्यास वेळोवेळी, इच्छेनुसार पाणी पिणे जनावरांना शक्य होते. अती थंड पाण्यापेक्षा साधारण थंड असलेले पाणी उष्णतामान कमी करून ताण कमी करते.
- अति उष्णतेमुळे जनावरांनासुद्धा उन्हाळ्यात नाकातून रक्तस्त्राव होत असतो. हा रक्तस्त्राव संकरित जनावरांमध्ये मोठ्या प्रमाणात दिसून येतो. यामध्ये जनावरांच्या नाकातून लाल-गडद रंगाचे रक्त वाहते. अशा जनावरांना उपाय म्हणून त्यांच्या डोक्यावर थंड पाणी घालावे. जनावरांना भरपूर थंड पाणी पिण्यास द्यावे. हिरवा चारा द्यावा. जनावरे झाडाखाली किंवा गोठ्यात बांधावीत. रक्तस्त्राव थांबत नसेल, तर पशुवैद्यकीय अधिकाऱ्याच्या सल्ल्याने जनावरांना जीवनसत्त्व 'क' आहारातून किंवा औषधाच्या माध्यमातून द्यावे.
- उन्हाळ्यात हिरव्या वैरणीच्या कमतरतेमुळे जनावरे मिळतील त्या हिरव्या वनस्पती खात असतात. यामुळे विषारी वनस्पती बेशरम, घाणेरी, धोतरा खाण्यात येतात. त्यामुळे जनावरांना विषबाधा होऊन जनावरे गुंगल्यासारखी करतात, खात नाहीत, खाली बसतात व उठत नाहीत. ही लक्षणे दिसताच ताबडतोब पशुवैद्यकाशी संपर्क साधून उपचार करावेत.
- उन्हाळ्यामध्ये हिरव्या चाऱ्याअभावी शेतकरी जनावरांना उसाचे वाढे खाऊ घालतात. वाढे जास्त प्रमाणात खाल्ल्यामुळे वाढ्यामधील ऑक्झेलेट खनिज व जनावरांच्या शरीरातील कॅल्शिअम एकत्र होऊन लघवीवाटे निघून जाते. त्यामुळे कॅल्शिअमची पातळी कमी होते, त्यामुळे जनावरांना 'मिल्क फिव्हर' नावाचा रोग होतो, त्यामुळे जनावरे थकून एकदम खाली बसतात. शरीराचे तापमान कमी होते, रवंथ बंद होते, जनावरे खात नाहीत, दूध देणे कमी होते, शरीर थंड पडते, जनावरे मान टाकून बसतात. पशुतज्ज्ञांकडून वेळेवर उपचार करावेत. तसेच पशुतज्ज्ञांच्या सल्ल्याने जनावरांच्या वयानुसार खाद्यातून मिनरल मिक्श्चर द्यावे.
- उन्हाळ्यात जनावरांना उन्हाची प्रखरता कमी असताना म्हणजे सकाळच्या वेळी व सायंकाळच्या वेळी चरण्यास सोडावे. पण चरण्याची सोय नसल्यास याच वेळी म्हणजेच, सकाळी व सायंकाळी चरण्यास वैरण, चारा, खाद्य, गोठ्यात उपलब्ध करून द्यावे. उन्हाळ्यात कोरडा चारा कमी प्रमाणात द्यावा, पण हिरवा चारा मात्र मुबलक प्रमाणात

द्यावा. जी जनावरे दुभती आहेत, त्यांना दिवसाच्या वैरणीव्यतिरिक्त रात्रीदेखील चारा दोन-तीन वेळांमध्ये विभागून द्यावा.

- चाऱ्याबरोबरच, जनावरांना दिल्या जाणाऱ्या पिण्याच्या पाण्याचीदेखील व्यवस्थित सोय करावयास हवी. पाणी साठविण्याची जागा सावलीच्या ठिकाणी असावी, यामुळे पाणी तापणार नाही व त्यात शेवाळेही जमा होणार नाही. जनावरांना गुळाचे पाणी पाजल्यास पण पोटात गारवा तयार होतो. गुळाच्या पाण्यामुळे शरीरातील साखरेची गरज भागविली जाते आणि याचा दूध उत्पादनावर चांगला परिणाम होतो. जनावरांची धार काढण्यापूर्वीदेखील त्यांना पिण्यास पाणी द्यावे. एकंदरीत काय तर मुबलक प्रमाणात जनावरांना स्वच्छ व थंड पाणी पिण्यास द्यावे.
- वर्षभर जनावरांना हिरवा चारा उपलब्ध होईल अशा प्रकारे आपल्या शेतामध्ये चारा पिकाचे नियोजन करावे.
- उन्हाळ्यात जनावरांच्या आहारात हिरव्या चाऱ्याचे आणि खुराकाचे प्रमाण अधिक असावे, यामुळे शरीराचे तापमान सामान्य राखले जाते. परंतु ज्यांच्याकडे उन्हाळ्यात हिरवी वैरण नाही, त्यांनी नियोजन-व्यवस्थापन करणे गरजेचे आहे. याकरिता जेव्हा जनावरांची गरज भागवून हिरवी वैरण शिल्लक राहते, अशावेळी शिल्लक वैरण मुरघास करून साठवून ठेवावी. हिवाळ्यामध्ये जेव्हा शेतात हिरवा चारा असतो, तेव्हा उन्हाळ्याकरिता हिरव्या वैरणीची साठवणूक कशी करता येईल याचे नियोजन करून हिरव्या वैरणीचा मुरघास करावा. त्यामुळे उन्हाळ्यात हिरव्या वैरणीस पर्याय म्हणून मुरघासाचा सर्रास वापर करता येतो. असे केल्यास वर्षभर हिरवी वैरण आपण आपल्या दुभत्या जनावरांना देऊन दूध उत्पादनात सातत्य टिकवून ठेवू शकतो.
- उन्हाळ्याच्या दिवसांत जनावरांना जास्त घाम येत असल्याने घामाद्वारे खनिजांचे उत्सर्जन होत असते. शरीरातून खनिजांचा जास्त ऱ्हास झाल्यास दूध उत्पादनात मोठी घट संभवते. त्यामुळे उन्हाळ्यात जनावरांच्या आहारात खनिजांचा मुबलक वापर करावा, तसेच जनावरांच्या आहारात स्निग्धांचे अधिक प्रमाण असलेले घटक वापरावेत, कारण स्निग्धांशांपासून कर्बोदके आणि प्रथिनांपेक्षा अधिक ऊर्जा मिळत असते, त्यासाठी बायपास फॅट प्रकारचे खराक सध्या बाजारात उपलब्ध होत आहेत. अशा पद्धतीने उन्हाळ्यात पाणी, चारा व्यवस्थापन करावे.
- उन्हाळ्यात अपुरा चारा व निकृष्ट आहारामुळे जनावरे अशक्त बनून त्यांची प्रतिकारशक्ती कमी होते व ते विविध रोगांना बळी पडतात, म्हणून पशुतज्ज्ञांकडून वेळीच जनावरांना लाळ खुरकूत, घटसर्प, फऱ्या रोग नियंत्रणासाठी लस टोचावी. लसीकरणाची मोहिम एकाचवेळी संपूर्ण गावात राबवावी. त्यामुळे आजारांवर नियंत्रण करणे सोपे जाते. परोपजीवी जंतूंचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी जंतनाशक औषधे पाजावीत. गाभण जनावरे व दूध उत्पादक जनावरांची विशेष काळजी घ्यावी. जनावरांचा गोठा व परिसर स्वच्छ असावा. मलमूत्राची व्यवस्थित विल्हेवाट लावावी.

### उन्हाळ्यात म्हशीचे व्यवस्थापन

गाईपेक्षा म्हशींना उष्णतेचा त्रास जास्त होतो. उष्णता सहन करणाऱ्या घामग्रंथी म्हशीच्या कातडीत फार कमी असतात. सूर्यप्रकाश परावर्तित करण्यासाठी आवश्यक असणारी गाईसारखी कातडी असण्याऐवजी सूर्यप्रकाश काळ्या कातडीतून शोषला जाऊन म्हशीचे शारीरिक उष्णतामान वाढते म्हणून उष्णतेचा त्रास म्हशींना अधिक होतो व म्हशी माजावर येण्याचे प्रमाण कमी होते. याउलट थंड हवामान असलेल्या गोठ्यात गाईंप्रमाणे म्हशीसुद्धा उन्हाळ्यातही नियमित माजावर येतात. माजावर आलेल्या म्हशी ओळखाव्यात कारण या दिवसात त्यांच्यामध्ये माजाची लक्षणे कमी तीव्रतेची

असतात, त्यामुळे दिवसातून तीन-चार वेळा निरीक्षण करावे.

कृत्रिम रेतन करावयाचे असल्यास शक्यतो सकाळ अथवा संध्याकाळी करावे. म्हशींना डुंबण्यास सोडावे. ही त्यांची नैसर्गिक आवड आहे, त्यामुळे शरीराचे तापमान योग्य राखले जाते. म्हशींच्या अंगावर पडेल अशी पाण्याच्या फवाऱ्यांची व्यवस्था करावी, अशी व्यवस्था नसल्यास दिवसातून तीन-चार वेळा त्यांना पाण्याने धुवावे. दुपारच्या वेळी जनावरे गोठ्यामध्ये बांधावीत, या वेळेला ती सावलीत असणे गरजेचे आहे. गोठ्याच्या सभोवताली थंडावा राहण्यासाठी झाडे असणे आवश्यक आहे. उन्हाळ्यात छपरावर गवताचे आच्छादन टाकावे. शक्य असल्यास गोठ्याच्या बाजूंनी गोणपाटाचे किंवा पोत्याचे पडदे लोंबत ठेवून त्यावर पाणी फवारावे. जनावरांना पिण्यासाठी थंड पाण्याची व्यवस्था आवश्यक आहे, शक्य झाल्यास त्यात मीठ व गूळ टाकावे. अशा प्रकारे व्यवस्थापन केल्यास उन्हाळ्यात होणारे कमी दूध उत्पादन वाढू शकते.

पंख्याचा वापर करून उष्णता कमी करता येते. उन्हाच्या वेळी असे पंखे थंड वातावरण निर्मितीसाठी उपयोगी ठरतात. मोठ्या आकाराचे छतास बसविलेले पंखे गोठ्यांत वापरता येतात. उष्णता कमी करण्यासाठी थंड पाण्याचा शिडकारा याचा उपयोग करु शकतो. थंड पाणी शिंपडल्यामुळे शरीरातील उष्णता कमी होण्यास मदत होते. तेव्हा दर तासाला थंड पाण्याचे फवारल्यास गोठ्यातील उष्णतामान तर कमी होतेच, पण जनावराच्या शरीरावरचा उष्णतेचा ताण एकदम कमी होतो.

उन्हाळ्याच्या दिवसांत अनेक म्हशी साचलेल्या पाण्याच्या ठिकाणी तलाव, पाणथळे यात बसविल्या जातात. यातून म्हशींचे शरीर तापमान थंड ठेवण्याचा प्रयत्न होत असला तरी अस्वच्छ पाणी, वर चमकणारे ऊन, रोगप्रसार यांच्यादृष्टीने चुकीचा मार्ग अवलंब होतो. त्यापेक्षा गोठ्यातच जनावरांच्या अंगावर ओला कपडा टाकणे आणि तो कपडा दर तासाला थंड पाण्याने ओला करणे अधिक चांगले. जनावरे गोठ्यात मोकळी असल्यास थोडीफार हालचाल करून उष्णतेचा ताण कमी करतात, पण बांधलेली जनावरे मात्र अधिक अस्वस्थ होऊन 'ल्हाकू' लागतात म्हणजेच श्वास वाढतो. उन्हाळ्यात जनावरांच्या गोठ्यात थंडावा वरील प्रमाणे कसा ठेवता येईल यासाठी प्रयत्नशील राहावे. त्यामुळे तापमान वाढल्याची नोंद झाल्याबरोबर उष्णतेचा ताण कमी करता येतो.




✲ मार्गदर्शक ✲

www.mafsu.in

www.knpcvs.in

**कर्नल प्रा. (डॉ.) ए. एम. पातुरकर**
मा. कुलगुरु, मपमविवि, नागपुर

**डॉ. एस. व्ही. उपाध्ये**
अधिष्ठाता, पशुविज्ञान विद्याशाखा, मपमविवि, नागपुर

**डॉ. एन. व्ही. कुरकुरे**
संचालक संशोधन, मपमविवि, नागपुर

**डॉ. ए. यु. भिकाने**
संचालक विस्तार शिक्षण, मपमविवि, नागपुर

**डॉ. व्ही. डी. आहेर**
सहयोगी अधिष्ठाता
क्रांनापापवैम, शिरवळ, जि. सातारा

✲ संकलन ✲

**डॉ. स्मिता आर. कोल्हे**
संशोधन प्रकल्प प्रमुख, पशुवैद्यकीय व पशुसंवर्धन विस्तार शिक्षण विभाग
क्रांनापापवैम, शिरवळ, जि. सातारा

संपर्क : टोल फ्री क्रमांक : १८००-२३३-३२६८ सकाळी १० ते सायं. ६ वा.